पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक २

**सभावृत्तांत**

दिनांक २१/०६/२०१३ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक २१/०६/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहुल - सभापती
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. जाधव साधना रामदास
५) मा. शितोळे शैलजा बाबुराव
६) मा. काळजे नितीन प्रताप

याशिवाय मा.गावडे – नगरसचिव, मा.दुधेकर, मा.खाबडे – कार्यकारी अभियंता, मा.तुमराम – प्रशासन अधिकारी (आस्थापना) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-**

**विषय क्रमांक -१)** वॉर्ड क्र.१० मोशी येथील दत्तनगर (चोविसावाडी) कडे जाणा-या रस्त्यावर स्टॉर्म वॉटर लाईन टाकणेबाबत. निविदा क्र. ११/१४/२०१२-१४. मा.नितीन प्रताप काळजे, मा.किरण बाळासाहेब मोटे यांचा प्रस्ताव.

**विषय क्रमांक -२)** पिं.चिं.मनपाच्या विधी समितीचे अधिकारानुसार सर्व विभागप्रमुख यांस विधी समितीचे सभेस उपस्थीत राहणेबाबत. मा.प्रशांत शितोळे, मा.भाऊसाहेब भोईर यांचा प्रस्ताव..

-------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक :- मा. वैशाली काळभोर अनुमोदक :- मा. शैलजा शितोळे

मा.नगरसेवक आप्पा बारणे यांचे वडील चंदू बारणे, मा.नगरसेवक अजित गव्हाणे यांचे वडील दामोदर गव्हाणे, मा.सुमन नेटके नगरसेविका यांच्या सासूबाई गंगूबाई नेटके तसेच माजी नगरसेवक राजेंद्र काळे यांना श्रध्दांजली वाहुन सभा तहकूब करण्यात यावी. ( शुक्रवार दिनांक २८/०६/२०१३ दुपारी ३.०० पर्यंत )

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली )

मा.सभापती :- सभा शुक्रवार दिनांक २८/०६/२०१३ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत तहकुब करणेत येत आहे.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.विधी समिती

कार्यपत्रिका क्रमांक २

**सभावृत्तांत**

**(दिनांक २१/०६/२०१३ ची तहकुब सभा)**

दिनांक २८/०६/२०१३ वेळ – दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक २१/०६/२०१३ ची तहकूब पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक २८/०६/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.जवळकर वैशाली राहुल - सभापती
२) मा.मोटे किरण बाळासाहेब
३) मा.काळभोर वैशाली जालिंदर
४) मा.जाधव साधना रामदास
५) मा.प्रशांत शितोळे
६) मा.शितोळे शैलजा बाबुराव
७) मा.काळजे नितीन प्रताप
८) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

याशिवाय मा.टेकाळे, मा.गायकवाड – सहा.आयुक्त, मा.गावडे – नगरसचिव, मा.दुधेकर, मा.खाबडे – कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

**अ) दिनांक ०५/०४/२०१३, ०८/०४/२०१३ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्र. २२ ) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

**ब) दिनांक ०७/०६/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (विशेष सभा) ( कार्यपत्रिका क्र.१ ) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

**----------**

ठराव क्रमांक :४ विषय क्रमांक : १

दिनांक : २८/०६/२०१३ विभाग – ब प्रभाग स्थापत्य

सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.नितीन काळजे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बप्र/काअ/१/कावि/१८८/२०१३, दि.१०/४/१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे चिंचवड प्रभाग क्र.२२ चाफेकर चौक चिंचवड येथील चाफेकर बंधुंचे नवीन पुतळे उभारणेकामी र.रु. ५०,००,०००/- ( अक्षरी र.रु.पन्नास लाख फक्त ) चे पुर्वगणनापत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :५ विषय क्रमांक : २

दिनांक : २८/०६/२०१३ विभाग – ब प्रभाग स्थापत्य

सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.भाऊसाहेब भोईर

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बप्र/काअ/१/कावि/१८६/२०१३, दिनांक - १०/०४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे चिंचवड प्रभाग क्र. २२ चाफेकर चौक येथील चाफेकर बंधुंचे नवीन पुतळयासाठी चवथरा उभारणेकामी र.रु. ५०,००,०००/- ( अक्षरी र.रु.पन्नास लाख फक्त ) चे पुर्वगणनापत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :६ विषय क्रमांक : ३

दिनांक : २८/०६/२०१३ विभाग – प्रशासन

सुचक : मा.साधना जाधव अनुमोदक : मा.नितीन काळजे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/५०३/२०१३, दिनांक - २२/०४ /२०१३

विषय :- श्री.जुंधारे ज्ञानदेव रामचंद्र, उप अभियंता स्थापत्य यांना पे बॅन्ड र.रु. १५६००-३९१०० ग्रेड पे र.रु. ६६०० या वेतनश्रेणीमध्ये कार्यकारी अभियंता, स्थापत्य पदावर पदोन्नतीने करावयाच्या नेमणुकीस मान्यता मिळणेबाबत..

ठराव क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७ विषय क्रमांक : ४

दिनांक : २८/०६/२०१३ विभाग - प्रशासन

सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.शैलजा शितोळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/४६२/२०१३,

दिनांक - १२/०४ /२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.अशोक मुंढे, सहाय्यक आयुक्त यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दि. १/०९/२०१२ पासुन पुढे शासन सेवेतील अधिकारी नव्याने महानगरपालिकेमध्ये सहाय्यक आयुक्त या पदावर रुजु होई पर्यंतच्या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ८ विषय क्रमांक : ५

दिनांक : २८/०६/२०१३ विभाग – प्रशासन

सुचक : मा.साधना जाधव अनुमोदक : मा.नितीन काळजे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/४६१/२०१३,

दिनांक - १२/०४ /२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.शहाजी पवार, सहाय्यक आयुक्त यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दि. २३/०३/२०१२ पासुन पुढे शासन सेवेतील अधिकारी नव्याने महानगरपालिकेमध्ये सहाय्यक आयुक्त या पदावर रुजु होईपर्यंतच्या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९ विषय क्रमांक : ६

दिनांक : २८/०६/२०१३ विभाग –जशुके सेक्र.२३ वियुत

सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.शैलजा शितोळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/वि/१५१/२०१३, दि.३०/०४/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पुनावळे येथील पाण्याची टाकी भरणे करीता पंपिंग मशिनरी बसविणे व २२ के.व्ही सबस्टेशन उभारणेकामी र.रु.७६,००,०००/- चे पुर्वगणनापत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभा ठराव क्रमांक २९४ दिनांक २०/०५/२०१३ अन्वये सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेत आलेली असल्यामुळे मा.आयुक्त यांचे विनंतीनुसार सदरचे विषयपत्र मागे घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १० विषय क्रमांक : ७
दिनांक : २८/०६/२०१३ विभाग – ब प्रभाग स्थापत्य
सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.साधना जाधव
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बप्र/४/कावि/१८६/२०१३,
दिनांक - ३/५/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे प्रभाग क्र.१८ किवळे मामुर्डी येथील अनाधिकृत बांधकामे काढणेकामी मशिनरी पुरविणेकामी र.रु. २४,००,०००/- ( अक्षरी र.रु.चोवीस लाख फक्त ) चे पुर्वगणनापत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ११ विषय क्रमांक : ८
दिनांक : २८/०६/२०१३ विभाग – ब प्रभाग स्थापत्य
सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.शैजला शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बप्र/४/कावि/१८७/२०१३,
दिनांक - ३/५/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे प्रभाग क्र.१८ किवळे मधील मामुर्डी परिसरातील रस्ते खडीमुरुमाचे करणेकामी र.रु.४०,००,०००/- ( अक्षरी र.रु.चाळीस लाख फक्त ) चे पुर्वगणनापत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १२ विषय क्रमांक : ९
दिनांक : २८/०६/२०१३ विभाग –स्थापत्य ब मुख्यालय
सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.किरण मोटे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. स्था/बमु/७/७/२०१३, दि.१०/०६/२०१३
विषय :- मनपाच्या पर्यटनविकास आराखडयांतर्गत मोरवाडी येथे उद्यानासाठी आरक्षीत जागेत बहुउद्देशीय कलाकेंद्र उभारणेबाबत..

विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.</u>**

ठराव क्रमांक : १३ विषय क्रमांक : १०
दिनांक : २८/०६/२०१३
सुचक : मा.नितीन काळजे अनुमोदक : मा.किरण मोटे
संदर्भ : मा.नितीन काळजे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव -

वॉर्ड क्र.१० मोशी येथील दत्तनगर (चोविसावाडी) कडे जाणा-या रस्त्यावर स्टॉर्म वॉटर लाईन टाकणे (निविदा क्र.११/१४/२०१२-१४) कामांतर्गत दत्तनगर (चोविसावाडी) कडे जाणा-या

नाल्यातून स्टॉर्म वॉटर लाईनचे काम प्रस्तावित आहे. सदर नाल्याच्या कडेने पाईप टाकून नाल्याच्या दुस-या बाजूने रस्ता करण्याचे प्रस्तावित आहे. तथापि सदर वस्तीवर जाणेकरीता विकास आराखडयातील रस्त्याचे काम प्रस्तावित असलेने सदर नाल्यातून पाईप टाकणेची आवश्यकता नाही. त्यामुळे सदरचे काम त्याच वॉर्डात म्हणजेच प्रभाग क्र.७ च-होली येथील गावठाणात करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १४ विषय क्रमांक : ११

दिनांक : २८/०६/२०१३

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.भाऊसाहेब भोईर

संदर्भ : मा.प्रशांत शितोळे, मा.भाऊसाहेब भोईर यांचा प्रस्ताव -

पिं.चिं.मनपाच्या विधी समितीचे अधिकारानुसार सर्व विभागप्रमुख यांस विधी समितीचे सभेस उपस्थित राहणेकरीता मा.आयुक्त यांनी सर्व विभागांना परिपत्रकाव्दारे आदेश निर्गमित करावेत व महापालिका सभा ठराव क्र.३०३६ दि.२०/०९/१९९५ नुसार कार्यवाही करणेत येत आहे. सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता तातडीने कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/५९३/२०१३
दिनांक - २९ /०६/२०१३

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.